कार्यारंभ आदेश

वांबोरी कात्रड पठारेवस्ती शिवरस्ता मुरमीकरण खडीकरण करणे ता. राहूरी

**जिल्हा परिषद,अहमदनगर**
**सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग,**
**जिल्हा परिषद आदेश क्रं.साबाउ/लेखा-६/३५०/२०१८**
**दिनांक. २०/ १२ /२०१८**

संदर्भ :- १)प्रमाआ क्र.बांध/कार्या-४/प्रशा३/उत्तर/२(१ व ३०)/१८ दि ७/११/२०१८

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये विषयांकीत कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तसेच कामास तांत्रिक मान्यताही प्राप्त झालेली आहे. आपण उक्त कामाचा करारनामा पूर्ण केलेला आहे. प्रस्तुत कामाचा मक्ता आपणास देणेत येत आहे. आपण सदर काम उपअभियंता जि.प.सा.बां.उपविभाग **राहूरी** यांचे देखरेखीखाली व मानांकनाप्रमाणे करावे व पुढील पत्रव्यवहार त्यांचेमार्फतच करावा. तसेच काम सुरु करणेपूर्वी शाखा अभियंता/ उप अभियंता यांचेकडून तांत्रिक मार्गदर्शन घेऊनच कामास सुरुवात करावी. पूर्व परवानगी शिवाय कामास सुरवात करु नये.

या कामावर बालकामगार(प्रतिबंध व निर्मुलन)अधिनियम १९६८चे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. शासन परिपत्रक क्र.२०१८/प्र.क्र.१९८/बांध४/दि.१२/१०/२०१८ नुसार कंत्राटदारांनी कामगारांचा कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी अणे बांधनकारक आहे.

निविदाधारकाबरोबर करारनामा व इतर सर्व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यारभ आदेश दिलेपासून सबळ कारणाशिवाय एकमहिन्याच्या आत काम सुरु केले नाही तर सदर कार्यारंभ आदेश आपोआप व्यपगत होईल.त्यानंतर निविदेमध्ये भाग घेतलेले इतर निविदाधारकापैकी आर्थिक तक्त्याच्या क्रमानुसार जो न्युनतम दरास काम करणेस्तयार होईल अशा निविदाधारकाकडून नमूद काम् पूर्ण करुन घेणेची कार्यवाही पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी.

कामाचा दोष निवारण कालावधी दोन वर्ष राहील. कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराचे नांव, कार्यारंभ आदेश दिनांक, कामाची निविदा रक्कम, काम पुर्ण करण्याचा दिनांक, दोष निवारण कालावधी इ. माहिती असलेला फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.

| अ. नं | कामाचे नांव | निविदा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी | लेखाशिर्ष | देकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | **वांबोरी कात्रड पठारेवस्ती शिवरस्ता मुरमीकरण खडीकरण करणे ता. राहूरी** | २,६४,०४२ | ३ महिणे | ४९५३जि.प.रस्ते व मो-याची कामे,हायमॅक्स सौर दिवे, पथदिवे इ.सुविधा | अंदाजपत्रकीय दराने |

सदर आदेश जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक नं. २०१८१२२०१३०३२१ असा आहे.

कार्यकारी अभियंता
जि.प.सा.बां.उत्तर विभाग अ.नगर

प्रति,

ग्रामपंचायत **वांबोरी .** तालुका **राहूरी** जि.अहमदनगर

प्रत - उपअभियंता जि.प.सा.बां.उपविभाग **राहूरी** यांना माहीतीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- कंत्राटदाराने कामाचा आदेश प्राप्त झालेपासुन १५ दिवसांचे आत कामाचा व त्यावरील कामगारांचा शासकीय विमा संचलनालय मुंबई यांचेकडे विमा उतरविणे बंधणकारक असून विमा प्रपत्र प्राप्त झालेची खात्री करावी. व देयका सोबत सादर करावीत.

३/- सदरचे काम संबधित कंत्राटदारास दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन घेणेची जबाबदारी आपली असून सदर काम गुणवत्तापुर्वक व स्पेसिफिकेशन प्रमाणे पूर्ण करुन घेणेत यावे. तसेच कामाचे विनिर्देशाप्रमाणे गुणवत्ता नियंत्रण चाचण्या घेण्यात यावे.

४/- संबंधीत कामाचे शाखा अभियंता यांनी काम सुरु झालेनंतर सदर काम पूर्ण होईपर्यंत वेगवेगळया टप्प्यांची कामांची माहिती व छायाचित्रे निर्माण/नियोजन साईटवर अपलोड करणेत यावे.